क्र.ॲकब्यु/पोउपअधि/बुल/दैगुअ/२०–१५५
कार्यालय पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा
दिनांक २९.०१.२०२०

प्रति,

मा.पोलीस अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र,अमरावती.

विषय : दैनिक गुन्हे अहवाल

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | बुलडाणा |
| २ | मुळ तक्रारदाराचे नांव | श्री. गोपाल जयराम रेखाते वय २५ वर्ष, व्यवसाय–शेती रा.वरवट बकाल ता.संग्रामपूर जि. बुलढाणा शिक्षण–बी.ए. |
| ३ | आरोपीचे नांव व हुद्या | लोकसेवक श्री. प्रभु शेषराव सातपुते, वय ३२ वर्षे, पद–तलाठी सजा वरवट बकाल, वर्ग–३, ता. संग्रामपुर, जि.बुलडाणा रा. श्रीकृपा रेसीडेन्सी शेगाव |
| ४ | आरोपीचे खाते व वर्ग. | महसुल विभाग, वर्ग–३ |
| ५ | लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| ६ | पो.स्टे.अपराध क्र. व कलम | पो.स्टे. तामगाव अप.क्र. १४/२०२० कलम ७ ला. प्र.का. १९८८ संशोधन २०१८ |
| ७ | घटनेचे ठिकाण | तलाठी कार्यालय, वरवट बकाल ता.संग्रामपुर |
| ८ | घटना तारीख वेळ | दि.२८.०१.२०२० चे १७.०५ वा. |
| ९ | गुन्हा दाखल तारीख वेळ | दि.२८.०१.२०२० चे २२.४५ वा. |
| १० | आरोपी अटक तारीख वेळ | दि.२८.०१.२०२० चे २३.१४ वा. |
| ११ | तपास अधिकारी | श्री. प्रविण खंडारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.बुलडाणा |
| १२ | कारण | प्लॉटचे ऑनलाईन सातबारा मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी तसेच सामाईक शेती चे सातबारा मध्ये नावाची दुरुस्ती करुन देण्यासाठी |
| १३ | अपसंपदा | .. |
| १४ | अंगझडती/घरझडती/लॉकर झडती मध्ये जप्त केलेली रक्कम/मालमत्ता. | घरझडती घेण्यांत येत आहे. |
| १५ | थोडक्यात उपलब्ध पुराव्याचा तपशील | पडताळणी व सापळा पंचनामा तसेच जप्तीपत्रकाप्रमाणे |
| १६ | तक्रारदार | इ.मा.व. |

**थोडक्यात हकीकत**

दिनांक १०.०१.२०२० रोजी तक्रारदार श्री. गोपाल जयराम रेखाते रा. वरवट बकाल यांनी समक्ष ला.प्र.वि.कार्यालय बुलडाणा येथे समक्ष हजर येवुन लेखी तक्रार दिली की, त्यांचे

Scanned by CamScanner

वरवट बकाल येथील गट क्र.२७२ मधील ००.०७.२३ आर या प्लॉटचे ऑनलाईन सातबारा मध्ये माझे चुलत भाऊ गणेश तुकाराम रेखाते यांचे नाव समाविष्ट करण्यासाठी तसेच काकणवाडा बु. शिवारातील गट क्र.१३४ मधील २.८३ आर सामाईक शेती चे सातबारा मध्ये माझे चुलत भाऊ अनंता पांडुरंग रेखाते यांचे नावाची दुरुस्ती करुन देण्यासाठी लोकसेवक श्री. प्रभु शेषराव सातपुते, तलाठी वरवट बकाल यांनी १४,०००/— रुपये लाचेची मागणी करीत आहे.

सदर तक्रारी संबधाने दिनांक १३.०१.२०२०, दिनांक २०.०१.२०२० व दिनांक २७.०१.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान पंच क्र.१ यांचे समक्ष तलाठी कार्यालयात लोकसेवक श्री. सातपुते यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष तडजोडी अंती १०,०००/— रुपयांची लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने दिनांक २८.०१.२०२० रोजी सापळा कार्यवाही दरम्यान पंच क्र.१ यांचेसमक्ष तलाठी कार्यालय वरवट बकाल येथे १०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले.

आलोसे यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे. लाचेचा सापळा दरम्यान केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा व ईतर कार्यवाही हॉटेल साई,संग्रामपूर येथे करण्यात आली.

अशाप्रकारे आरोपी लोकसेवक श्री. प्रभु शेषराव सातपुते वय ३२ वर्षे, पद—तलाठी वरवट बकाल ता. संग्रामपुर जि.बुलडाणा यांनी तक्रारदार यांना त्यांचे वरवट बकाल येथील गट क्र.२७२ मधील ००.०७.२३ आर या प्लॉटचे ऑनलाईन सातबारा मध्ये त्यांचे चुलत भाऊ गणेश तुकाराम रेखाते यांचे नाव समाविष्ट करण्यासाठी तसेच काकणवाडा बु. शिवारातील गट क्र.१३४ मधील २.८३ आर सामाईक शेती चे सातबारा मध्ये त्यांचे चुलत भाऊ अनंता पांडुरंग रेखाते यांचे नावाची दुरुस्ती करुन देण्यासाठी तडजोड अंती १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. आरोपी लोकसेवक यांनी त्यांचा स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेवुन लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केले. वरुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.तामगाव अप.नं. १४/२०२० कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (संशोधन २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील आरोपी लोकसेवक यांना दिनांक २८.०१.२०२० चे २३.१४ वाजता अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास आम्ही स्वतः करीत असुन, तपास प्रगतीपथावर सुरु आहे.

(प्रविण खंडारे)
पोलीस निरीक्षक
अॅ.क.ब्युरो,बुलडाणा.

प्रत माहितीस सादर

१.मा.महासंचालक, अॅ.क.ब्युरो, म.रा.मुंबई.
२.मा.जिल्हाधिकारी ,बुलडाणा

Scanned by CamScanner